4)

**Government Of Maharashtra**

**महाराष्ट्र शासन**

**Office of the Joint Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai**

**उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,**

**Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.**

**विकास सेंटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.**

**Tel.No. 25206199/25208182** **Email : didicmumbai@gmail.com**

दिनांक

**मुंबई शहर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक दिनांक १९.१२.२०२३ चे इतिवृत्त.**

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठित करण्याबाबत, शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र. निप्रप-२०२०/प्र.क्र. २८/उद्योग-७, दि. १९.१०.२०२० मध्ये निर्देश देण्यात आल्यानुसार मुंबई शहराकरीता निर्यात प्रचालन समितीची स्थापना करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन तसे समिती सदस्य यांना कळविण्यात आल आहे. राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने व निर्यातदारांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याकरीता तसेच जिल्ह्यातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन समिती परिषदेस सहाय्य करण्यासाठी एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरीता मुंबई शहर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९.१२.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०००१ येथे संपन्न झाली.

सर्व प्रथम सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती उद्योग उपसंचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत करून निर्यात प्रचालन समिती संदर्भात मुंबई शहर जिल्ह्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या निर्यात प्रचालन समिती अंतर्गत करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबत तसेच मुंबई शहराकरीता एक जिल्हा एक उत्पादन प्रकरणी निर्यात प्रोत्साहनाकरीता तसेच निर्यात वाढीकरीता उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच मागील इतिवृत्तात नमुद केल्याप्रमाणे मा. विकास आयुक्त (उद्योग) यांनी मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना अग्रेषित केलेल्या अर्धशासकीय पत्रात नमुद मुद्यांबाबत कार्यवाहीचा अहवाल (Compliance Report) मा. अध्यक्ष यांना सादर केला. बैठकीसाठी उपस्थित प्रतिनिधी यांनी विषयासंदर्भात खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

**Government Of Maharashtra**
**महाराष्ट्र शासन**
**Office of the Joint Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai**
**उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,**
**Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.**
**विकास सेटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.**
Tel.No. 25206199/25208182 Email: didicmumbai@gmail.com


53

दिनांक

सादर,

मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्याकरीता झालेल्या एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरीता मुंबई शहराकरीता उपक्रम राबविण्याबाबत जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक दि. १९.१२.२०२३ चे इतिवृत्त मान्यतेस्व व स्वाक्षरीकरीता सादर,

उद्योग उप संचालक (मुं.प्रा.वि.) तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती.

मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती.

23/1/24

| अ.क्र | प्रतिनिधी | उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांनी दिलेले निर्देश. |
|---|---|---|---|
| १. | उद्योग उप संचालक आणि Ernst & Young प्रकल्प सल्लागार | • Gems & Jewelry क्षेत्रातील झालेल्या घसरणीबद्दल चर्चा झाली.<br>• तसेच निर्यात प्रोत्साहनाकरीता मा.विकास आयुक्त (उद्योग) यांचे अर्धशासकिय पत्रानुसार १० Point Program/ Agenda आणि Achievements बाबत Presentation सादर करण्यात आले. | • मा.अध्यक्ष महोदयांनी Gems & Jewellery क्षेत्रातील झालेल्या घसरणीबाबतच्या कारणांबाबत विचारणा केली. |
| २. | Gems & Jewelry Export Promotion Council | • घसरणीचे सर्वात मोठे कारण जागतिक राजकारण आहे. सद्या सुरु असलेल्या रशिया-युक्रेन युध्दाचा त्यास सर्वाधिक फटका बसला आहे. कारण बहुतांश कच्चे हिरे हा रशिया कडून प्राप्त होतो. | • सर्व निर्यात प्रचालन समितीने संभाव्य निर्यातदारांसाठी लवकरात लवकर कार्यशाळा आयोजित करावी. तसेच बँकेत कार्यशाळेबद्दल स्टॉल लावावा. |
| ३. | उद्योग उप संचालक | • जिल्हयातील संभाव्य निर्यातदारांसाठी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत IGNITE (Industry and Government Networking for Industries Transformation and Empowerment ) Maharashtra तसेच Cornell Maharashtra ६० या नाविन्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. | • मा.अध्यक्षांनी या बाबत निर्यात क्षेत्रात MSME चे भरीव योगदान असून त्यांना यात सामावून घेण्याच्या आणि बाजार विस्तारिकरणावर भर देण्याबाबत सूचना दिल्या. |
| ४. | डॉ.प्रविण कुमार, सहसंचालक, विदेश व्यापार महासंचालनालय | • Directorate General of Foreign Trade कडे असणारा IEC DATA जिल्हा उद्योग केंद्राला उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. | • जिल्हा उद्योग केंद्राने सदर DATA Directorate General of Foreign Trade यांचेकडून प्राप्त करुन घेण्याचे निर्देश मा.अध्यक्षांनी दिले. |
| ५. | जिल्हा नियोजन अधिकारी | • कौशल्य विकास विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या Gems & Jewelry Courses च्या माध्यमातून या क्षेत्रातील निर्यातदारांसाठी आयोजित करता येतील, व सदर कार्यक्रमासाठी जिल्हानियोजन समिती मधीन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत चर्चा झाली. | • मा. अध्यक्ष महोदयांनी सदर बाबतीत Gems & Jewelry Export Promotion Council ने कौशल्य विकास विभागा सोबत समन्वय साधून प्रस्तुत कार्यक्रमासाठीचा प्रस्ताव कौशल्य विकास विभागाकडे सादर करण्याबाबत निर्देश दिले. |

सभेअंती सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

उद्योग उप संचालक (मुं.प्रा.वि.) तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती.

मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती.